# संभ्रमांकडून स्पष्टतेकडे....

एके दुपारी मेसमध्ये जेवायला पोहचलो. जवळच्या एका गावात कामानिमित्त गेल्यामुळे जेवायला उशीर झाला होता. जेवायला बसलो. तेवढ्यात मेसमध्ये स्वयंपाक बनवणाऱ्या अंजनाबाई स्वयंपाकघरातून बाहेर आल्या.

“जेवण झालं का बाई?” – मी सहज चौकशी केली.

“आज जेवाचा नाय. आज उपास हाय” – तितक्याच सहजतेने बाई म्हणाल्या.

”का?” - मी कारण विचारलं.

“आज सगळ्याले जेवण नाय पुरला. म्हणून मी जेवणार नाय.” – बाईंनी कारण सांगितलं. ते ऐकून क्षणभर मी उडालोच. एवढ्या उच्च दर्जाची नैतिकता बाईंमध्ये कुठून आली?

1998 पासुन सर्च संस्थेने धानोरा तालुक्यातील दुर्गम आदिवासी गावांमध्ये आरोग्यसेवा द्यायला सुरुवात केली. या कामासाठी सर्चचे कार्यकर्ते महादेव सातपुते आणि हरिदास साखरे आपली घरं, गावं सोडून जवळच्या कारवाफा व धानोरा या गावांमध्ये राहायला आले आणि कामास सुरुवात केली. त्यावेळची परिस्थिती फार कठीण होती. गावांमध्ये जायला रस्ते नव्हते. घनदाट जंगल पार करून हे दोघे गावांत पोचायचे. पावसाळ्यात तर वैद्यकीय साहित्य डोक्यावर वाहून नेत रुग्णांचा उपचार करायचे. नक्षलवाद्यांची भीती तर सतत डोक्यावर टांगती तलवार होती. एवढ्या कठीण परिस्थितीत काम करण्याचे धैर्य या दोघांनी कुठून मिळवले?

नवजात बालमृत्यु रोखण्यासाठी सर्चने विकसित केलेले घरोघरी नवजात बाळाची काळजी (HBNC) हे मॉडेल आता सर्वज्ञात आहे. अनेक ठिकाणी ते वापरले जात आहे. या प्रभावी मॉडेलची गुणवत्ता आणि अचूकता तपासण्यासाठी, टिकवून ठेवण्यासाठी, सुधारण्यासाठी कौसल्या रोडे आणि कुसुम गडपायले या स्त्री सुपरवायजर्स 39 गैरअदिवासी गावांमध्ये दररोज फिरत असतात. विदर्भातल्या कडक उन्हात, मुसळधार पावसात दररोज 30 ते 40 किमी अंतर सायकलीने तुडवत ह्या दोघी गावांमधील नवजात बाळांची काळजी घेतात. संशोधनासाठी आवश्यक माहिती गोळा करण्याचे कौशल्य त्यांनी उत्तमरित्या आत्मसात केले आहे. कुठल्या प्रेरणांनी या बाया मृत्यूला नवजात बाळांपासुन दूर रोखून धरण्याचे कार्य करत आहेत?

एप्रिल 2009 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूकींवर नक्षलवाद्यांनी नेहमीप्रमाणे बहिष्कार टाकला होता. मतदान केल्यास हाताची बोटं तोडण्याची धमकी लोकांना दिली होती. या भीतीपोटी अनेक गावातल्या लोकांनी मतदान केलेच नाही. अशा परिस्थितीत सावरगावातील नक्टू राउत यांनी स्वत: मतदान केले. एवढेच नव्हे तर गावातल्या लोकांना मतदानाचे आवाहन करण्याचा वेडेपणा देखील केला. भ्रष्टाचाराविरुद्ध लढतांना स्थानिक

राजकारणामुळे नक्टूकाकांना गावातल्याच काही लोकांच्या विरोधाला – द्वेषाला तोंड द्यावे लागत आहे. त्यांचा एक सहकारी या विरोधकांविरुद्ध नेहमी द्वेष ओकत असतो. मात्र नक्टूकाकांच्या चेहऱ्यावर आणि मनात द्वेषाचा कुठेही लवलेश नसतो. त्यांनी अनेकदा स्वत: पुढाकार घेवून विरोधकांना समजवण्याचा प्रयत्न देखील केला. ह्या माणसाने आयुष्यात कधी गांधीविचार वाचल्याची सुतराम शक्यता नाही. मनाची निर्भयता आणि निर्वैर वृत्ती नक्टूकाकांना कुठे गवसली?

सामान्यपणे जीवन व्यतीत करणाऱ्या, फारसं पुस्तकी शिक्षण न झालेल्या ह्या माणसांनी कठीण परिस्थितीत काम करण्याची प्रेरणा, धैर्य, निर्भयता कुठून कमवली असा प्रश्न मनाला पडला. (या बावळट मनाला प्रश्न फार पडतात.) विचारांती जाणवलं की ह्या माणसांच्या जगण्याला कृतीचा परीसस्पर्श झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या जगण्याचे सोने झाले. त्यांनी कधी वैचारिक प्रेरणांचा काथ्याकूट केला नाही. बुद्धीजीवी माणसं मात्र वैचारिक प्रेरणांचे फुगे फुगवण्यात आयुष्यातला बराच वेळ घालवतात. जरा कुठे कठोर वास्तवाची टाचणी लागली की ते फुगे पटापट फुटतात.

आधी वैचारिक स्पष्टता मग कृती असा विचार करायला त्यांना फुरसत कुठे होती. जीवनाचे कठोर वास्तव समोर उभे ठाकले होते. वैचारिक स्पष्टतेपेक्षा कृतीतीच खरी गरज होती. कठोर वास्तवाला कृतीतून भिडण्यातूनच त्यांची नैतिकता बळकट झाली. मनं निर्भय झाली. त्या अनुभवातूनच त्यांना स्पष्टता आली.

बुद्धीजीवी माणसं बौद्धिक प्रेरणांचे चंदन उगाळण्यात (आणि स्वत:च्या माथी टिळा मारण्यात) धन्यता मानतात. ह्यांनी मात्र आपल्या आयुष्यात सदैव कृतीचा गुलाल उधळला, जो इतरांच्या अंगावर – जीवनात आपसूक पसरला.

म्हणोन येथे कर्मचि पाहिजे!

**********************************************************************

गडचिरोली जिल्ह्यात रोजगार हमी योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी लोकांसोबत काम करत आहे. कामाची सुरुवात रोजगार हमी योजना, तिच्या अंमलबजावणीतील विविध प्रक्रिया व अडचणी समजून घेण्यात झाली. पेरणीनंतरच्या दोन महिन्यांच्या काळात गडचिरोलीतल्या लोकांना रोजगाराची गरज असते. त्यासाठी लोकांनी रोजगार हमीच्या कामांची मागणी करावी म्हणून सर्चमध्ये गावप्रतिनिधींची मिटींग बोलावली. त्या मिटींगमध्ये कामाची मागणी करण्याचा अनेक गावांनी निर्णय घेतला. प्रत्यक्षात फक्त एका गावाने कामाची मागणी केली. (तिथे काम सुरु झाले सुद्धा.)

कामाच्या मागणीच्या अभावाची कारणे समजून घेण्यासाठी आम्ही एक सर्व्हेक्षण केले. त्यात असे आढळले की बहुसंख्य लोकांना योजनेची नेमकी माहिती नाही. मग ती नेमकी माहिती लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी आम्ही गावोगावी पथनाट्ये केली. त्यासाठी ‘निर्माण’ मधील युवांची मोलाची मदत झाली. त्याआधी काही विशिष्ट गावांसोबत पुढे काम करता यावे म्हणून मी अनेक गावांमध्ये फिरलो. लोकांशी चर्चा केली. पण लोकांचा प्रतिसाद फारच थंड होता. पथनाट्यांना मात्र लोकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. आता लोकांना नेमकी माहिती मिळाली आहे, कामाची गरज असल्यामुळे ते तत्काळ कामाची मागणी करतील असे आम्हाला वाटले होते. प्रत्यक्षात फक्त एका गावाने तत्काळ कामाची मागणी केली. (तिथे वेळेवर काम सुरु देखील झाले.) इतर गावांमध्ये मात्र कामाची मागणी होत नव्हती. म्हणून आम्ही काही गावांमध्ये परत मिटींग घेतल्या. कामाच्या मागणीचे आवाहन केले.

खुर्सा गावात अमृत आणि मी अशा एका मिटींगसाठी गेलो होतो. सरपंचबाईंच्या घरी गेलो. अजून लोकांनी मागणीचे फॉर्म भरले नाहीत असे तिथे कळले. त्या दिवशी सरपंचबाईंचा नवरा दारू प्यायला होता. नशेत जेवतांना आमच्याशी निरर्थक बोलत होता. हळूच त्याने ताटातले सर्व अन्न बाजूलाच बसलेल्या कुत्र्याला टाकून दिले. लोकांसोबत मिटींग झालीच नाही.

तो डिसेंबरचा महिना होता. रात्रीचे 8 वाजले होते. बाहेर कडाक्याची थंडी होती. आमच्या पोटात भूक मावत नव्हती. त्यात भर फिस्कटलेली मिटींग आणि सरपंचबाईंच्या दारु प्यायलेल्या नवऱ्याची. वरकरणी हे प्रकरण अमृत आणि मी मिश्किलतेने हाताळले. आतून मात्र आम्ही निराश होतो. गडचिरोलीतल्या बेरोजगारीच्या प्रश्नाला लोकांना रोजगार हमी योजना हे उत्तर हवे आहे का? कारण शारिरीक कष्टाचे रोजगार हमीचे काम ही लोकांची प्राथमिकता असण्याची शक्यता कमी आहे. शिवाय सगळे जग ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्थेकडे संक्रमण करत असतांना आपण गडचिरोलीतल्या लोकांना शेती अर्थव्यवस्थेकडे नेत आहोत. कशासाठी? तर त्यांनी सुद्धा शेवटी विदर्भातल्या शेतकऱ्यांप्रमाणे आत्महत्या करावी म्हणून? असे प्रश्न आम्हाला पडले. (या प्रश्नांना अनेक आयाम आहेत. परंतु विषयांतर होईल म्हणून तूर्तास ती चर्चा नको.)

असल्या विचारांमुळे आणि अनुभवांमुळे रोजगार हमीतला माझा रस आणि उत्साह मावळू लागला. येणाऱ्या नैराश्यातून माझा लोकसहभाग कमी कमी होत मी योजनेतील थिअरॉटिकल मुद्द्यांमध्ये जास्त रमू लागलो. खुप संदर्भ वाचून डोक्यात प्रकाश (की अंधार?) पडला की सेड्युल ऑफ रेट्स हाच कळीचा मुद्दा आहे. सापडली! मला कमजोर कडी सापडली. मग प्रोटोकॉल लिहिणे, आणखी संदर्भ वाचणे इत्यादी बुद्धीची खाज भागवणाऱ्या उद्योगांमध्ये काही वेळ गेला. सेड्युल ऑफ रेट्सवर संशोधन करून आपण

महाराष्ट्र सरकारला ते बदलण्यास भाग पाडू. बघतोच कसे बदलत नाहीत ते (च्यायला!). आणखी काही संदर्भ वाचून केव्हातरी मध्येच डोक्यात उगवलं – छे! सेड्युल ऑफ रेट्स काय घेऊन बसलास. मूळ प्रश्न किमान मजूरीचा आहे. महागाई वाढली तरी तीन वर्षात सरकारने त्यात काही सुधारणा केलेली नाही. आपण किमान मजूरीच्या प्रश्नावरच काम करायला पाहिजे. पब्लिक पॉलिसी रिसर्च वगैरे. नायनांनी (डॉ. अभय बंग) नाही का 1978 साली किमान मजूरीवर संशोधन करुन आख्ख्या महाराष्ट्राची मजूरी 4 रुपयांची 12 रुपये केली. व्यापक परिणाम घडवून आणला. किमान मजूरीवर संशोधन करून आपण व्यापक परिणाम करू शकू अशी मनोमन खात्री वाटायला लागली.

स्थानिक प्रश्नांना हाताळण्याआधीच व्यापकीकरणाची हवा डोक्यात शिरली होती. पुण्यातील मेट्रीक संस्थेने आयोजित केलेल्या संशोधन पद्धतींवरील कार्यशाळेनंतर मी मजूरी कमी-जास्त पडण्याची कारणं अभ्यासण्यासाठी संशोधन प्रकल्प आखला होता. त्याच्या निष्कर्षांचे मी कितपत व्यापकीकरण करु शकेल याविषयी मनात नाना शंका होत्या. शेवटी तो महत्त्वाचा प्रकल्प रखडला. एक चांगली संधी गमावल्याने आज पुन्हा पुन्हा वाईट वाटते.

रोजगार हमीतले हे सर्व मुद्दे गैरलागू होते असेही नाही. परंतु त्यांना हाताळण्याची वेळ आणि पद्धत चूकत होती. डॉ. अभय बंग, डॉ. आनंद करंदीकर ही अनुभवी माणसं आपापल्या अनुभवांचे खडे बोल वेळोवेळी मला सुनावत होते. मी मात्र ते फार मनावर घेत नव्हतो.

अशा व्यापारांनी मन एकीकडे व्यापलेले असतांना मनाचा एक कोपरा शांत सुरात सातत्याने बजावत होता – “थांब! कुठल्याही निष्कर्षावर पोचायची घाई करू नकोस. प्रत्यक्ष डोळ्यांनी बघ. अनुभव घे.” म्हणून उन्हाळ्यातील रोजगार हमीच्या कामांचा हंगाम डोळ्यात तेल घालून बघण्याचा निर्णय घेतला.

आणि रोजगार हमीचा हंगाम सुरु झाला. अनेक गावात कामे सुरु झाली. लोक मोठ्या संख्येने कामांवर जावू लागले. गावागावात रोजगार हमीचे महाभारत घडत होते. परंतू मनाच्या संभ्रमावस्थेमुळे माझ्या हातातील कृतीचे गांडीव डळमळत होते. अशा वेळी कृष्णाच्या रुपात दरिद्रीनारायण (लोकं) माझ्या मदतीला धावून आले. त्यांनी वास्तवाची गीता माझ्यासमोर मांडली. ‘सरकारने रोजगार हमीची मजूरी बँकेमार्फतच वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे, चातगाव बँक घोडेझरी गावापासुन 40 किमी अंतरावर आहे.तिथल्या मजूराला बँकेत खाते खोलून मजूरी मिळवण्यासाठी स्वत:च्या खिशातले 650 रु. खर्च करावे लागणार आहेत. प्रत्यक्षात त्याला मिळणारी मजूरी 650 रुपयांइतकीच किंवा त्यापेक्षा कमी आहे, कुरखेड्यातील लोकांना दोन महिने उलटूनही अद्याप मजूरी मिळालेली

नाही. रेखाटोला गावातील लोकांना मजूरी न मिळाल्यामुळे रेशन दुकानातला तांदूळ विकत घेता येत नाही' असले या गीतेतले अध्याय होते. ते ऐकून माझ्या मनातले संभ्रम पार दूर पळाले आणि मी जोमाने कामाला लागलो.

बँकेमार्फतच मजूरी वाटप करण्याच्या सरकारच्या तुघलकी निर्णयाला कायदेशीर मार्गाने आव्हान द्यायचे ठरवले. त्यासाठी उन्हातान्हात फिरून सहा गावांतल्या लोकांशी चर्चा करून केस स्टडीज बनवल्या. लोकांची निवदने तयार करून जिल्ह्याधिकाऱ्यांना दिली. एमकेसीएलचे संचालक विवेक सावंतांसोबत प्रियदर्शन आणि मी मुंबईला मंत्रालयात जावून वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर गडचिरोलीतली परिस्थिती मांडली. आमच्या या कृतीने बँकामार्फत मजूरी वाटपाचा दीर्घकालीन प्रश्न सुटणार नाही हे आधीच आमच्या मनात स्पष्ट होते. त्यासाठी ज्ञान – तंत्रज्ञानाधिष्ठीत उपायांची – व्यवस्थांची गरज आहे हे कळत होते. पण म्हटलं ते नंतर बघू. आधी माझ्या सहा गावातल्या लोकांच्या हाती त्यांच्या कष्टाची मजूरी पडू दे. त्यासाठी कायदेशीर लढाई हा एकमेव पर्याय उपलब्ध होता. ती अद्याप चालू आहे. आम्ही लोकांसोबत या निर्णयाविरुद्ध लढत आहोत.

वास्तवाला भिडण्याच्या या काळात माझे सगळ्यात जास्त शिक्षण झाले.
खऱ्या समस्या लोकांमध्ये जाऊनच कळतात हे अनेक चूका करून लख्खपणे जाणवलं. एखाद्या समस्येला लोकांसोबत भिडण्यातूनच संभाव्य उपाय सुचतात. कामाच्या सुरुवातीला माझ्या डोक्यात व्यापकीरकरणाची हवा इतकी शिरली होती की स्थानिक लोकांचे प्रश्न सोडवणे म्हणजे व्यक्तिगत तक्रार निवारणाचे क्षुल्लक आणि निरुपयोगी काम वाटायचे. एखाद्या व्यक्तीचा वा गावाचा प्रश्न सोडवून काय फरक पडणार असे वाटायचे. प्रत्यक्ष कामातनं मात्र जाणवायला लागलं की एखाद्या समस्येचे नेमके विश्लेषण करण्यासाठी, संभाव्य उपायांचा विचार करण्याची कुवत मिळवण्यासाठी त्या व्यापक समस्येच्या एका मूर्त तुकड्याला लोकांसोबत प्रत्यक्ष भिडणे, भोगणे, तोडणे फार गरजेचे असते. ज्या लोकांसोबत आपण काम करतो, त्यांच्याप्रती आपली ती जबाबदारी देखील असते.

समाजाला कशाची गरज आहे यापेक्षा मला काय करायचंय ह्यालाच मी प्राधान्य देत होतो. अशा वेळी मग मनात भ्रामक समजूती तयार होतात. आपल्या सोयीच्या अशा समजूतींना वास्तवातले एखाददुसरे उदाहरण दिसले तरी ती समजूत मनात पक्की होते. सत्यच भासू लागते. लोकांच्या खऱ्या समस्यांपर्यंत आपण मग पोचतच नाही. अशा परिस्थितीत व्यक्तिनिष्ठतेचा मोह दूर सारत वस्तुनिष्ठ सत्यान्वेषणाला गत्यंतर नाही. त्यासाठी संशोधनाच्या पद्धती उपयोगी ठरतात.

वास्तवाला भिडण्याच्या या काळात रोजगार हमीच्या प्रश्नाशी आणि गडचिरोलीतल्या लोकांशी मी पहिल्यांदा इतका एकरुप होऊ शकलो. माझ्यावर असलेल्या जबाबदारीची

प्रकर्षाने जाणीव झाली. मला सतत वाटू लागलं – मला माझी नियती समस्येशी, लोकांशी जोडता आली पाहिजे. जे समस्येचे होईल, तेच माझे होईल. समस्येचे काय होईल ते होईल, पण माझे कल्याण मात्र व्हायलाच पाहिजे असं नाही चालणार. तसे झाल्यास तो काठावर बसून भाष्य करण्याचा एक नवा प्रकार ठरेल. ते नैतिकदृष्ट्या सुद्धा पतनाचे ठरेल.

आजवरच्या माझ्या जीवनविषयक मुलभूत प्रेरणा प्रामुख्याने वाचन, श्रवण, चर्चा, भावना आणि चिंतन या माध्यमांतून आकारास आल्या. या काळात त्यांना कृतीची आणि अनुभवाची जोड मिळाली. आता त्या जास्त अस्सल आणि प्रगल्भ वाटतात. आज त्या वास्तवाच्या जमिनीत पाय घट्ट रोवून उभ्या आहेत. सुख – दु:खाचे आणि व्यक्तिगत स्वार्थाचे झंझावात त्यांना मूळापासुन सहजासहजी हलवू शकणार नाहीत.

पवन आणि प्रियदर्शन या माझ्या सहकाऱ्यांसोबतच्या कामातून – चर्चांमधून – प्रवासामुळे मनाच्या अनेक वृत्ती पालटल्या. त्यांच्यामुळे मी निसर्ग, माणसं, जीवनाविषयी अधिक सजग बनलो. जिज्ञासू बनलो. चांगले सहकारी मिळणे ही माझ्यासाठी मोठी मिळकत आहे. तो कदाचित स्वतंत्र लिखाणाचा विषय होवू शकेल.

या काळात वैशाखवणव्यात होरपळून रूक्ष बनलेल्या निसर्गाला वसंताच्या स्पर्शाने नवी पालवी फुटत होती. त्याचवेळी संभ्रमांमुळे कोमजलेल्या माझ्या मनाला वास्तवाच्या स्पर्शामुळे संवेदनशीलतेची नवी पालवी फुटत होती. आतबाहेरील ही एकतानता बघणं हा सुद्धा रोमांचक अनुभव राहिला.

जीवनाच्या कठोर वास्तवाशी – त्यात जगणाऱ्या माणसांशी स्वत:ला जोडून घेत 'हे वास्तव मी बदलून टाकेन' या आशावादात आणि कर्मयोगात अर्थपूर्ण जगण्याची गुरुकिल्ली दडलेली आहे, ह्या 'निर्माण' विचाराची प्रचिती वास्तवाला भिडतांना मला आली. स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही, हेच खरे!

गोपाल सुभाष महाजन
निर्माण फेलो
सर्च, गडचिरोली.
mahagopsu@gmail.com